महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा २०२२
स्वतंत्र पेपर क्रमांक – 2 [उद्योग निरीक्षक]
परीक्षा दिनांक:- ११ मार्च, २०२३

**2022**

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका – II

**E17**

## सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे / विषयासंबंधीचे ज्ञान

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 4002221

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. कबड्डीची सर्वोच्च प्रशासकीय संस्था कोणती आहे ?
   (1) आंतरराष्ट्रीय कबड्डी संघटना
   (2) आंतरराष्ट्रीय कबड्डी महासंघ
   (3) आंतरराष्ट्रीय कबड्डी परिषद
   (4) आंतरराष्ट्रीय कबड्डी समिती

   Which is the highest governing body of Kabaddi ?
   (1) International Kabaddi Association
   (2) International Kabaddi Federation
   (3) International Kabaddi Council
   (4) International Kabaddi Committee

2. लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या हस्ते भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि कृषीतज्ज्ञ ________ यांच्या पुतळ्याचे अनावरण नुकतेच मेक्सिको मध्ये करण्यात आले.
   (1) सोहन सिंह भाकना
   (2) लाला हरदयाळ
   (3) पांडुरंग खानखोजे
   (4) विष्णु गणेश पिंगळे

   Recently Speaker of the Lok Sabha Shri. Om Birla unveiled a Statue of the Indian freedom fighter and Agricultural scientist ________ in Mexico.
   (1) Sohan Singh Bhakna
   (2) Lala Hardayal
   (3) Pandurang Khankhoje
   (4) Vishnu Ganesh Pingle

3. आयुष्यमान भारत अंतर्गत आयुष्यमान भारत आरोग्य आणि कल्याण केंद्राची टारगेट (लक्ष्य) संख्या किती आहे ? (2022)
   (1) 1 लाख
   (2) 1.5 लाख
   (3) 2.5 लाख
   (4) 5 लाख

   What is the target of Number of Ayushman Bharat Health and Wellness Centres under the Ayushman Bharat ? (2022)
   (1) 1 Lakh
   (2) 1.5 Lakh
   (3) 2.5 Lakh
   (4) 5 Lakh

4. योग्य कथन / ने ओळखा.

A. डॉ. सायरस पुनावाला यांना उद्योग व व्यापार क्षेत्रातील कार्यासाठी 'पद्मभूषण पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

B. डॉ. एन. चंद्रशेखरन यांना वैद्यकीय क्षेत्रातील कार्यासाठी 'पद्मभूषण पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

(1) फक्त A (2) फक्त B

(3) A व B दोन्ही (4) वरीलपैकी नाही

Select the correct statements.

A. Dr. Cyrus Poonawala was honoured with 'Padma Bhushan Award' in the field of Industry and Business.

B. Dr. N. Chandrashekhran was honoured with 'Padma Bhushan Award' in the field of Medical.

(1) Only A (2) Only B

(3) Both A and B (4) None of the above

---

5. महिला व बालविकास मंत्रालयने मुलांची सुरक्षा व कल्याण या उद्देशाने ________ ही योजना सुरु केली.

(1) मिशन पोषण 2.0 (2) मिशन वात्सल्य

(3) मिशन शक्ती (4) वरील सर्व

The Ministry of Women and Child Development started the scheme ________ having aim to safety and well-being of children.

(1) Mission Poshan 2.0 (2) Mission Vatsalya

(3) Mission Shakti (4) All of the above

---

6. भारतातील पहिले ऑनलाईन गेमिंग सेंटर ऑफ एक्सलन्स कोणत्या राज्यात/केंद्रशासित प्रदेशात स्थापन केले जाणार आहे ?

(1) सिक्कीम (2) कर्नाटक

(3) मेघालय (4) गुजरात

India's First Online Gaming Centre of Excellence is to be set up in which State / Union territories ?

(1) Sikkim (2) Karnataka

(3) Meghalaya (4) Gujarat

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**7.** लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे नुकतेच कोणत्या देशामध्ये अनावरण करण्यात आले ?

(1) रशिया (2) मेक्सिको
(3) चिली (4) पेरु

In which of the following country a statue of Lokshahir Annabhau Sathe has been recently unveiled ?

(1) Russia (2) Mexico
(3) Chili (4) Peru

---

**8.** खालीलपैकी कोणी नुकताच प्रतिष्ठेचा रॅमन मॅगॅसेसे पुरस्कार स्वीकारण्यास नकार दिला ?

(1) मनिष सिसोदिया (2) सिताराम येचुरी
(3) के. के. शैलजा (4) पिनरई विजयन

Who among the following has recently declined prestigious Raman Magsaysay Award ?

(1) Manish Sisodia (2) Sitaram Yechury
(3) K K Shailaja (4) Pinarayi Vijayan

---

**9.** साहित्य अकादमी द्वारा पुरस्कृत करण्यात आलेल्या 'श्रीमतीचरित्रम' या संस्कृत ग्रंथाचे लेखन खालीलपैकी कोणी केले आहे ?

(1) शतावधानी गणेश (2) श्रुती कानिटकर
(3) अशोक अकलूजकर (4) पंडीत गुलाम दस्तगीर बिराजदार

Who is the author of Sahitya Akademy Awarded Sanskrit text 'Shrimaticharitram' ?

(1) Shatavadhani Ganesh (2) Shruti Kanitakar
(3) Ashok Aklujkar (4) Pandit Gulam Dastagir Birajdar

---

**10.** केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय हे भारतातील गावांच्या सांस्कृतिक पैलूंचे सर्वेक्षण _______ या नावाने करणार आहे.

(1) मेरा गांव, मेरा देश (2) मेरा गांव, मेरा स्वाभिमान
(3) मेरा गांव, मेरी सभ्यता (4) मेरा गांव, मेरी धरोहर

The Union Ministry of Culture is going to survey the cultural aspects of Indian villages titled __________ .

(1) Mera Gaon, Mera Desh (2) Mera Gaon, Mera Swabhiman
(3) Mera Gaon, Meri Sabhyata (4) Mera Gaon, Meri Dharohar

---

**11.** रिकाम्या जागेतील प्रश्न चिन्हांसाठी योग्य संख्यांची जोडी निवडा.




(1) 60, 110 (2) 0, 1 (3) 323, 257 (4) 288, 362

Find out the pair of missing numbers.




(1) 60, 110 (2) 0, 1 (3) 323, 257 (4) 288, 362

---

**12.** A, B, C आणि D यांना एका ओळीत बसायचे आहेत. पण C आणि D हे एकत्र असू शकत नाही. तसेच, B हा तिसऱ्या स्थानावर असू शकत नाही.

खालीलपैकी कोणते चुकीचे आहे ?

(1) A हा पहिल्या स्थानावर आहे (2) A हा दुसऱ्या स्थानावर आहे

(3) A हा तिसऱ्या स्थानावर आहे (4) A हा चौथ्या स्थानावर आहे

A, B, C and D are to be seated in a row. But C and D can't be together. Also, B can't be at third place.

Which of the following must be wrong ?

(1) A is at the first place (2) A is at the second place

(3) A is at the third place (4) A is at the fourth place

---

**13.** अचूक उत्तर शोधा.

$\sqrt{361} \times 2 \div \sqrt{4} = \boxed{?}$

(1) 181 (2) 19

(3) 38 (4) 361

Find the correct answer.

$\sqrt{361} \times 2 \div \sqrt{4} = \boxed{?}$

(1) 181 (2) 19

(3) 38 (4) 361

**14.** 'शब्द' 'दोन स्वर असलेले शब्द', 'पाच स्वर असलेले शब्द' यासाठी खालील पर्यायातून अचूक व्हेन आकृती निवडा.

(1)  (2) 

(3)  (4) 

Choose proper Venn diagram for 'words', 'words having two vowels', 'words having five vowels'.

(1)  (2) 

(3)  (4) 

**15.** माहिती अभ्यासून त्या संदर्भात निश्चितपणे सत्य असलेले विधान निवडा.

a. एका कुटुंबात P, Q, R, S, T व U या सहा व्यक्ती आणि दोन जोडपी आहेत.

b. S ही P ची आजी आणि Q ची आई आहे.

c. R ही Q ची बायको आहे.

d. U ही T ची नात आहे.

पर्याय :

(1) P हा U चा निश्चितपणे भाऊ आहे

(2) P ही निश्चितपणे U ची एकटी बहीण आहे

(3) S ला दोन नातवंडे आहेत आणि त्यापैकी एक निश्चितपणे मुलगी आहे

(4) Q ला नक्कीच दोन मुली आहेत

Study the information and select definitely true statement with respect to it.

a. In a family of six persons P, Q, R, S, T and U and there are two married couples.

b. S is grandmother of P and mother of Q.

c. R is wife of Q.

d. U is the granddaughter of T.

Options :

(1) It is certain that P is a brother of U

(2) P is a definitely only sister of U

(3) S has two grandchildren and one of them is certainly a girl

(4) It is certain that Q has two daughters

---

**16.** एका सांकेतिक भाषेत 'BUSINESS' हा शब्द 2309500 असा लिहीला जातो. तर 'GENERAL' हा शब्द कसा लिहीला जाईल ?

(1) 7514518112 (2) 7555913

(3) 7969393 (4) 755591

In a certain language 'BUSINESS' is coded as 2309500. How is 'GENERAL' coded in that code ?

(1) 7514518112 (2) 7555913

(3) 7969393 (4) 755591

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**17.** जर तेल म्हणजे बटर, बटर म्हणजे दूध, दूध म्हणजे पाणी, पाणी म्हणजे चहा, चहा म्हणजे पेट्रोल, पेट्रोल म्हणजे कॉफी, तर इंधन म्हणून कशाचा वापर करावा लागेल ?

(1) पेट्रोल (2) चहा

(3) कॉफी (4) पाणी

If oil means butter, butter means milk, milk means water, water means tea, tea means petrol, petrol means coffee, then what is used as a fuel ?

(1) petrol (2) tea

(3) coffee (4) water

---

**18.** पहिल्या जोडीतील संबंध शोधा आणि प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी योग्य अंक शोधा.

L : 1728 : : J : ?

(1) 2197 (2) 1000

(3) 100 (4) 729

Find out the relationship between first pair and find out the number for question mark.

L : 1728 : : J : ?

(1) 2197 (2) 1000

(3) 100 (4) 729

---

**19.** जर एका वर्षातील $25^{th}$ डिसेंबरला रविवार आहे तर त्या महिन्यात किती शनिवार असतील ?

(1) 4 (2) 5

(3) 6 (4) वरीलपैकी नाही

If $25^{th}$ December in a year is on Sunday, then how many Saturdays are there in that month ?

(1) 4 (2) 5

(3) 6 (4) None of the above

**20.** N ची आई R आहे, S हा R चा मुलगा आहे, G आणि M भाऊ–बहीण आहेत. M हा N चा मुलगा आहे. तर G ची आजी कोण आहे ?

(1) S (2) N

(3) R (4) वरीलपैकी नाही

R is the mother of N, S is the son of R, G and M are brother and sister. M is the son of N. Who is the grandmother of G ?

(1) S (2) N

(3) R (4) None of the above

---

**21.** एखाद्या राज्यामध्ये आस्तित्वात असलेली विधानपरिषद बरखास्त करण्याचा अधिकार खालीलपैकी कोणाला आहे ?

(1) राज्याची विधानसभा (2) राज्यपाल

(3) संसद (4) राष्ट्रपती

Who among the following can abolish a State Legislative Council of a State ?

(1) State Assembly (2) Governor

(3) Parliament (4) President

---

**22.** 73 व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार जर एखादी ग्रामपंचायत बरखास्त करण्यात आली तर तिची निवडणूक किती कालावधीत घेणे आवश्यक आहे ?

(1) 1 महिना (2) 3 महिने

(3) 6 महिने (4) 1 वर्ष

According to 73rd Constitutional Amendment Act, if a Gram Panchayat is dissolved, its elections are to be held within what period ?

(1) 1 month (2) 3 months

(3) 6 months (4) 1 year

---

**23.** खालीलपैकी कोणती समिती भारतातील निवडणूक सुधारणांशी संबंधित नाही ?

(1) एन. एन. वोहरा समिती (2) दिनेश गोस्वामी समिती

(3) तारकुंडे समिती (4) इंद्रजीत गुप्ता समिती

Amongst the following, which Committee is not associated with the electoral reforms in India ?

(1) N. N. Vohra Committee (2) Dinesh Goswami Committee

(3) Tarkunde Committee (4) Indrajit Gupta Committee

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**24.** 'जनहित याचिका' या संकल्पनेचा उगम खालीलपैकी कोणत्या देशात झाला आहे ?

(1) कॅनडा (2) ऑस्ट्रेलिया

(3) भारत (4) अमेरिका

The concept of PIL (Public Interest Litigation) originated in which of the following country ?

(1) Canada (2) Australia

(3) India (4) USA

**25.** खालीलपैकी कोणत्या उच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र लक्षद्विप या केंद्रशासित प्रदेशापर्यंत आहे ?

(1) कोलकाता (2) तामिळनाडू

(3) बॉम्बे (4) केरळ

The jurisdiction of which of the following High Court extends to the Union Territory of Lakshadweep ?

(1) Kolkata (2) Tamil Nadu

(3) Bombay (4) Kerala

**26.** नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याचा अधिकार कोणाला आहे ?

(1) जिल्हाधिकारी (2) विभागीय आयुक्त

(3) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष (4) मुख्य कार्यकारी अधिकारी

Who has the right to constitute a new Grampanchayat ?

(1) District Collector (2) Divisional Commissioner

(3) President of Zilha Parishad (4) Chief Executive Officer

**27.** भारतीय राज्यघटनेतील कोणते कलम जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या संरक्षणाशी संबंधीत आहे ?

(1) कलम 26 (2) कलम 28

(3) कलम 21 (4) कलम 29

Which Article of the Indian Constitution deals with the Protection of Life and Personal Liberty ?

(1) Article 26 (2) Article 28

(3) Article 21 (4) Article 29

**28.** खालीलपैकी कोणत्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त नाही ?

a. तामिळ

b. मल्याळम

c. बंगाली

d. ओडिया

(1) फक्त b, c आणि d (2) फक्त a आणि c

(3) फक्त c (4) फक्त d

Which among the following are not classical languages ?

a. Tamil

b. Malayalam

c. Bangla

d. Odia

(1) Only b, c and d (2) Only a and c

(3) Only c (4) Only d

**29.** खालीलपैकी कोणते कलम राज्याच्या महाधिवक्ताशी संबंधित आहे ?

(1) कलम – 194 (2) कलम – 177

(3) कलम – 197 (4) कलम – 165

Which of the following Article deals with Advocate General of State ?

(1) Article – 194 (2) Article – 177

(3) Article – 197 (4) Article – 165

**30.** खालीलपैकी कोणते कलम ग्रामसभेशी संबंधीत आहे ?

(1) कलम – 243 A (2) कलम – 243 B

(3) कलम – 243 C (4) कलम – 243 D

Which of the following Article deals with Gram Sabha ?

(1) Article – 243 A (2) Article – 243 B

(3) Article – 243 C (4) Article – 243 D

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**31.** खालीलपैकी कोणत्या तारखेपासून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलात आला ?

(1) 28th एप्रिल 2015 (2) 20th एप्रिल 2015

(3) 28th मे 2015 (4) 31st मे 2015

Which among the following is the date on which the Maharashtra Right to Public Service Act, 2015 came in force ?

(1) 28th April 2015 (2) 20th April 2015

(3) 28th May 2015 (4) 31st May 2015

---

**32.** राज्यशासन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या प्रयोजनाकरिता ____________ या नावाने संबोधला जाणारा एक आयोग, राजपत्रातील अधिसूचने द्वारे घटित करेल.

(1) महाराष्ट्र राज्य आयोग
(2) महाराष्ट्र राज्य नागरिकांच्या सेवांसाठी आयोग
(3) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क साठी आयोग
(4) महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

The State Government shall by notification in the Official Gazette, Constitute for the purposes of Maharashtra Right to Public Services Act, 2015 a commission to be called as

(1) Maharashtra State Commission
(2) Maharashtra State Commission for Services to Citizens
(3) Maharashtra State Commission for Human Rights
(4) Maharashtra State Right to Service Commission

---

**33.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अन्वये मुख्य आयुक्त आणि आयुक्त यांच्या नियुक्ती साठी स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष _______ असतात.

(1) राज्यपाल
(2) मुख्यमंत्री
(3) विधानसभेतील विरोधीपक्ष नेता
(4) मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेले एक कॅबीनेट मंत्री

Committee constituted for appointment of Chief Commissioner and the Commissioners under Maharashtra Right to Public Service Act, 2015 is presided over by

(1) Governor
(2) Chief Minister
(3) Leader of opposition of Assembly
(4) Any Cabinet Minister nominated by Chief Minister

---

**34.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 हा कायदा ____________ लोकसेवा देण्याकरिता पारित करण्यात आला.

a. पारदर्शक

b. कार्यक्षम

c. नियत वेळेत

d. वरीलपैकी एकही नाही

वरीलपैकी कोणते विधान / ने बरोबर आहे / त?

(1) a आणि b फक्त (2) b आणि c फक्त

(3) a, b आणि c फक्त (4) d फक्त

The Maharashtra Right to Public Service Act, 2015 is passed to provide ____________ public services.

a. transparent

b. efficient

c. timely

d. none of the above

Which of the above statement/s is / are correct ?

(1) a and b only (2) b and c only

(3) a, b and c only (4) d only

---

**35.** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 6(3) अन्वये अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे किती दिवसात अर्ज हस्तांतरण करणे भाग असते ?

(1) अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 5 दिवसांपेक्षा अधिक विलंबाने नाही

(2) अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांपेक्षा अधिक विलंबाने नाही

(3) अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 30 दिवसांपेक्षा अधिक विलंबाने नाही

(4) अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 45 दिवसांपेक्षा अधिक विलंबाने नाही

As per Section 6(3) of the Right to Information Act, 2005 within how many days transfer of application has to be made to other public authority ?

(1) not later than 5 days from the date of receipt of the application

(2) not later than 15 days from the date of receipt of the application

(3) not later than 30 days from the date of receipt of the application

(4) not later than 45 days from the date of receipt of the application

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**36.** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कोणते कलम त्रयस्थ पक्षाच्या माहितीशी संबंधित आहे ?

(1) कलम 10 (2) कलम 11

(3) कलम 12 (4) कलम 13

Which Section deals with Third Party information under Right to Information Act, 2005 ?

(1) Sec. 10 (2) Sec. 11

(3) Sec. 12 (4) Sec. 13

---

**37.** माहितीचा अधिकार कायदा, 2005 च्या अनुषंगाने खालीलपैकी कोणते विधान / विधाने चूकीचे आहे / आहेत ?

a. या कायद्यानुसार केंद्र सरकार भारताच्या सरन्यायाधीशाच्या संमतीने केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करेल.

b. केंद्रीय माहिती आयुक्तांची संख्या 12 पेक्षा जास्त नसावी.

c. मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती भारताचे सरन्यायाधीश राष्ट्रपतीशी सल्लामसलत करून करतात.

(1) a फक्त (2) a आणि b फक्त

(3) c फक्त (4) वरीलपैकी सर्व

In view of Right to Information Act, 2005 which of the following statement/s is/are false ?

a. Under Right to Information Act Central Govt. shall with the consent of Chief Justice of India Constitute Central Information Commission.

b. Central Information Commissioners should not exceed 12 in numbers.

c. The Chief Information Commissioner shall be appointed by Chief Justice in consultation with President of India.

(1) a only (2) a and b only

(3) c only (4) all of the above

**38.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 कलम 13 अंतर्गत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग घटित करण्यात येई पर्यंत, शासन आयोगाचे अधिकार व कार्ये कोणाकडे सोपवेल ?

(1) जिल्हा न्यायालय (2) महानगरपालिका आयुक्त
(3) विभागीय आयुक्त (4) पोलिस आयुक्त

Under Section 13 of Maharashtra Right to Public Service Act, 2015 till the time the Maharashtra State Commission for Right to Service is constituted, the Government may entrust the powers and functions of the Commission to the

(1) District Court (2) Municipal Commissioners
(3) Divisional Commissioners (4) Police Commissioners

**39.** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 हा कायदा लागू नसणाऱ्या संघटनांची माहिती कोणत्या अनुसूचीत दिली आहे ?

(1) प्रथम अनुसूची (2) द्वितीय अनुसूची
(3) तृतीय अनुसूची (4) नियमांत

The organisations to which the Right to Information Act, 2005 is not applicable are specified in which Schedule ?

(1) First Schedule (2) Second Schedule
(3) Third Schedule (4) Rules

**40.** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 11 अंतर्गत त्रयस्थ पक्षांवर नोटिस बजावण्यात आल्यावर, किती दिवसांत प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची संधी असते ?

(1) सात (2) दहा
(3) पंधरा (4) तीस

Under Section 11 of the Right to Information Act, 2005, within how many days from the date of receipt of notice, the third party can make representation against the proposed disclosure ?

(1) Seven (2) Ten
(3) Fifteen (4) Thirty

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**41.** भारताच्या डिपार्टमेंट ऑफ टेली कम्युनिकेशन च्या रेव्हेन्यु मॅनेजमेंट सिस्टम चे नाव __________ आहे.

(1) सरल (2) आर.एम.एस. (3) डॉट.आर.एम.एस. (4) सरस

Department of Telecommunication of India's revenue management system which is online is named as

(1) SARAL (2) R.M.S. (3) D.O.T.R.M.S. (4) SARAS

---

**42.** इंटरनेट प्रोटोकॉल पत्याला _______ असेही म्हणतात.

(1) स्थानाचा पत्ता (2) संस्थेचा पत्ता
(3) ठिपके असलेला चौकोन (4) डॉटेड आयत/ठिपके असलेला आयत

Internet protocol address is also called as

(1) Address of location (2) Address of organization
(3) Dotted quad (4) Dotted Rectangle

---

**43.** कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित ड्रायव्हरलेस कारमध्ये लिडार्स का वापरले जातात ?

(1) कार रांगेत लावण्यासाठी सहाय्य
(2) अंध स्थान निरीक्षण करण्यासाठी
(3) टक्कर चेतावणी
(4) 3-D नकाशा करणे, जे कारला संभाव्य धोके शोधून देते

Why lidars are used in Artificial Intelligence based driverless car ?

(1) Car Lane-keep Assistance
(2) Blind spot Monitoring
(3) Collision Warning
(4) Building 3-D map which allows car to detect potential hazards

---

**44.** Windows Azure साईट हे खालीलपैकी कसले उदाहरण आहे

(1) Saas (सेवा म्हणून सॉफ्टवेअर) (2) Iaas (सेवा म्हणून पायाभूत सुविधा)
(3) Paas (सेवा म्हणून प्लॅटफॉर्म) (4) Kaas (सेवा म्हणून ज्ञान)

Windows Azure site is example of

(1) Saas (Software as a service) (2) Iaas (Infrastructure as a service)
(3) Paas (Platform as a service) (4) Kaas (Knowledge as a service)

---

**45.** ए.एल.व्ही.आय.एन.एन. ही ड्रायव्हरला ड्राईव्ह करताना बघून तयार झालेली वाहन नियंत्रित करणारी सिस्टम असून यातील ALVINN या शब्दाची फोड खालील प्रकारे आहे.

(1) ऑटो लॅण्ड व्हेकल इन न्यू नेटवर्क

(2) ऑटोनॉमस लॅण्ड व्हेकल इन अ न्युरल नेटवर्क

(3) ऑटोमेटेड लॅण्ड व्हेकल इन नेक्स्ट नेटवर्क

(4) ॲडव्हांस लॅण्ड व्हेकल इन न्युरल नेटवर्क

ALVINN is a system which learns to control vehicles by watching a person drive here ALVINN stands for

(1) Auto Land Vehicle in New Network

(2) Autonomous Land Vehicle in a Neural Network

(3) Automated Land Vehicle in Next Network

(4) Advance Land Vehicle in Neural Network

---

**46.** NME-ICT चा पूर्ण रूप खालीलपैकी कोणता आहे ?

(1) नॅशनल मिशन ऑन इज्युकेशन थ्रु इन्फोर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी

(2) नॅशनल मिशन ऑन इ-गव्हर्नन्स थ्रु इन्फोर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी

(3) नॅशनल मिशन ऑन इ-कॉमर्स थ्रु इन्फोर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी

(4) नॅशनल मिशन ऑन इ-लर्निंग थ्रु इन्फोर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी

NME-ICT stands for

(1) National Mission on Education through Information and Communication Technology

(2) National Mission on e-governance through Information and Communication Technology

(3) National Mission on e-commerce through Information and Communication Technology

(4) National Mission on e-learning through Information and Communication Technology

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**47.** भारतीय मूळ असलेली भारतीय सोसायटीची "गावे" डिजीटली कनेक्ट करून प्रत्येक गावातील गावकऱ्यानां डिजीटल प्रशिक्षण देण्याचा प्रस्तावीत असलेला उपक्रम __________ हा आहे.

(1) ई-व्हिलेज (2) ई-रूरल

(3) डिजी-रूरल (4) डिजी-व्हिलेज

__________ aims to make the root of Indian society – "The villages" Digitally connected and every rural citizen digitally litrate.

(1) E-village (2) E-rural

(3) Digi-rural (4) Digi-village

---

**48.** दुसऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक भुस्थानिक माहिती काँग्रेस दरम्यान तयार केलेल्या अहवालानुसार __________ हे गव्हर्नन्स करिता एकात्मिक नॅशनल जिओपोर्टल आहे जे सर्व कॅडेस्ट्रल नकाशे आणि लँड पार्सल डेटासाठी एकल भांडार आणि कॅडेस्ट्रल बेस लेयरचा एकल प्रमाणिक स्रोत म्हणून काम करते.

(1) नॅशनल जेनेरीक डॉक्युमेंट रजिस्ट्रेशन सिस्टम (NGDRS)

(2) मातृभूमी जिओपोर्टल

(3) युनिक लँड पार्सल आयडेन्टीफीकेशन नंबर (ULPIN)

(4) वरीलपैकी नाही

As per a report prepared during $2^{nd}$ United Nations World Geospatial Information Congress __________ is an integrated National Geo-Portal for Governance that act as a single repository for all cadastral maps and land parcel data and single authentic source of the cadastral base layer.

(1) National Generic Document Registration System (NGDRS)

(2) Matribhoomi Geoportal

(3) Unique Land Parcel Identification Number (ULPIN)

(4) None of the above

---

**49.** प्राचीन वारसा असणाऱ्या शहरांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाद्वारे कोणती योजना राबविली जाते ?

(1) हार्ट (2) हृदय

(3) हार्दिक (4) हस्त

Which government scheme is focussed on holistic development of ancient and heritage cities ?

(1) HEART (2) HRIDAY

(3) HARDIK (4) HAST

---

50. डिजीटल इंडिया कॉर्पोरेशन च्या ____________ या विभागाने तंत्रज्ञान प्रयोगशाळेपासून जमिनीपर्यंत नेण्याच्या आणि "आयटी for मासेस" क्षेत्रात स्वत: साठी एक स्थान निर्माण केले आहे.

(1) नॅशनल ई-गव्हर्नन्स डिविजन (NeGD)

(2) टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट अँड डिप्लॉयमेंट डिविजन (TDDD)

(3) इंडिया सेमीकंडक्टर मिशन डिविजन

(4) माय गव्ह. डिविजन

The ____________ of Digital India Corporation has created a niche for itself in the area of taking the technologies from lab to land and "IT for Masses".

(1) National e-Governance Division (NeGD)

(2) Technology Development and Deployment Division (TDDD)

(3) India semiconductor Mission Division

(4) My Gov. Division

51. उद्योजकता विकास प्रशिक्षण निवासी कार्यक्रम किती दिवसांचा आहे ?

(1) 10 दिवस (2) 12 दिवस

(3) 15 दिवस (4) 2 दिवस

How long is the Entrepreneurship Development Training Residential Programme ?

(1) 10 days (2) 12 days

(3) 15 days (4) 2 days

52. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत सेवा व कृषी पूरक उपक्रमांसाठी व उत्पादन प्रकारातील उपक्रमांसाठी प्रकल्प किंमती अंतर्गत इमारत खर्चाची मर्यादा किती आहे ?

(1) 5% (2) 20%

(3) 70% (4) वरीलपैकी कोणतेही नाही

What is the limit of building cost under project cost for service and agricultural activities and manufacturing type activities under Chief Minister Employment Generation Programme Scheme ?

(1) 5% (2) 20%

(3) 70% (4) None of the above

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**53.** महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत क्षमतावृद्धी कार्यक्रमाची प्रकल्प किंमत जास्तीत जास्त किती निश्चित केली आहे ?

(1) रुपये 1 लाख (2) रुपये 2 लाख
(3) रुपये 10 लाख (4) वरीलपैकी कोणतेही नाही

What is the maximum fixed project cost of soft intervention program under Maharashtra State Industrial Cluster Development Programme Scheme ?

(1) Rs. 1 lakh (2) Rs. 2 lakh
(3) Rs. 10 lakh (4) None of the above

---

**54.** पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेमध्ये उत्पादन क्षेत्रांतर्गत, मार्जिन मनी सबसिडीसाठी प्रकल्पाची कमाल किंमत किती आहे ?

(1) रुपये 5 लाख (2) रुपये 8 लाख (3) रुपये 15 लाख (4) रुपये 50 लाख

What is the maximum cost of the project admissible for Margin Money subsidy under manufacturing sector in Prime Minister Employment Generation Programe (PMEGP) scheme ?

(1) Rs. 5 lakh (2) Rs. 8 lakh (3) Rs. 15 lakh (4) Rs. 50 lakh

---

**55.** जिल्हा उद्योग केंद्र-कर्ज योजने बाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?

(1) या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या बीज भांडवलाची रक्कम मृदू कर्ज म्हणून दरसाल 4 टक्के व्याजाने दिली जाते.
(2) या योजनेंतर्गत वितरीत केलेल्या बीज भांडवल परतफेडीचा कालावधी 5 वर्षे 6 महिने असतो.
(3) लाभार्थ्याची परतफेड केलेली रक्कम प्रथम व्याजापोटी जमा करून उर्वरित रक्कम मुद्दलापोटी जमा केली जाते.
(4) बीज भांडवलाच्या कर्जाच्या रकमेची विहित कालावधीत परतफेड करण्यात आली नाही तर थकीत रकमेवर द.सा.द.शे. 1 टक्के दंडनीय व्याज आकारले जाते.

Which of the following statement is not correct regarding District Industries Centre-Loan scheme ?

(1) Under this scheme, the amount of seed money is given as a soft loan with 4% per annum interest.
(2) Under this scheme, the repayment period of the disbursed seed money is 5 years and 6 months.
(3) The amount repaid by beneficiary is firstly credited as interest then the remaining amount as Principal.
(4) If the loan amount of seed money is not repaid within the prescribed period then penalty interest is charged with 1% per annum on the due amount.

---

**56.** सुधारित बीज भांडवल योजने संदर्भात खालील विधानांचा विचार करा.

a. या योजनेतील प्रकल्प किंमत कमाल रू. 50.00 लाख असते.

b. बीज भांडवलाची रक्कम मृदू कर्ज म्हणून दरसाल 6% व्याजाने देण्यात येते.

c. बीज भांडवल कर्जाची कमाल मर्यादा रू. 4.75 लाख असते.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?

(1) फक्त (a)
(2) फक्त (b) व (c)
(3) फक्त (b)
(4) फक्त (c)

